महाराष्ट्र शासन

**विभागीय शिक्षण उपसंचालक,**
पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय,
१७, डॉ.आंबेडकर मार्ग, लालदेवळासमोर,पुणे-४११ ००१

w'site : www.dydepune.com
e-mail: 11thonlineadmissiondydpune@gmail.com
Phone : (020) 26122217

## पुणे व पिंपरी चिंचवड मनपा क्षेत्रातील इ. ११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया-२०२०-२१

---

**प्रसिध्दी निवेदन-०३/२०२०**
**दि.११.०७.२०२०**

इ. ११ वी ऑनलाईन प्रवेशाचे कामकाज पुणे, मुंबई सह नाशिक, औरंगाबाद,अमरावती, नागपूर या महानगरपालिका क्षेत्रात शासन निर्णय दि. ०७.०१.२०१७, दि.०७.०३.२०१९ व दि.२३.०६.२०२० अन्वये सुरु करण्यात आलेले आहे. शैक्षणिक वर्ष २०२०-२१ साठी इ.११ वी प्रवेश प्रक्रियेचे संकेतस्थळ https://pune.11thadmission.org.in/ आहे.

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ.११ वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेसाठी कनिष्ठ महाविद्यालयाची नोंदणी सुरु झालेली आहे. त्याची माहिती खालील प्रमाणे

| एकूण कमविची संख्या | नोंदणी झालेले | ॲप्रुव्ह झालेले | त्रुटीमुळे ॲप्रुव्ह न झालेले |
|---|---|---|---|
| ३०४ | २११ | ७८ | १३३ |

वरील माहितीनुसार पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील अद्याप १३३ कॉलेजची माहिती शिक्षण उपसंचालक कार्यालयाकडून ॲप्रुव्ह केलेली नाही, परंतु वैयक्तिकरित्या कॉलेजच्या लॉगिन-इन ला एसएमएस द्वारे त्रुटी कळविण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार संबधित कनिष्ठ महाविद्यालयाच्या प्राचार्य यांनी आपणांस कळविण्यात आलेल्या त्रुटींच्या पुर्ततेबाबत आवश्यक ती कागदपत्रे अपलोड करावीत. जेणेकरुन आपले कनिष्ठ महाविद्यालय ॲप्रुव्ह करणे सोईचे होईल.

अद्यापही ९३ कॉलेजची नोंदणी राहिलेली आहे, त्यासर्व प्राचार्यांनी लवकरात लवकर नोंदणी पुर्ण करावी. जेणेकरुन आपले कनिष्ठ महाविद्यालय ॲप्रुव्ह करण्यासाठी उपसंचालक कार्यालयास पुरेसा वेळ मिळेल.

नव्याने समाविष्ट होणा-या गावातील कनिष्ठ महाविद्यालयाची नोंदणी https://pune.11thadmission.org.in/ या संकेतस्थळावरुन करावी. तसेच कॉलेजचे लॉगीन तयार करण्यासाठी सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात त्वरीत 11thonlineadmissiondydpune@gmail.com या ई-मेल आयडी वर प्रस्ताव पाठवावा, सदरच्या कामासाठी दि.१५.०७.२०२० पर्यंतच मुदतवाढ असल्याने प्रथम प्राधान्याने कार्यवाही करावी. नव्याने समाविष्ट झालेल्या ११ गावातील कोणत्याही कनिष्ठ महाविद्यालयाने आपल्यास्तरावर इ.११ वी चे ऑफलाईन प्रवेश देऊ नयेत. तसेच कॉलेजच्या नोंदणी बाबत प्राधान्याने कार्यवाही



Scanned with CamScanner

करावी. आपला प्रस्ताव न आल्याने कॉलेज नोंदणीस उशिर झाल्यास अथवा कॉलेजची नोंदणी होऊ न शकल्यास कोणतीही कायदेशिर बाब उद्‌भवल्यास प्राचार्य हे वैयक्तिकरित्या जबाबदार राहतील. याची नोंद घ्यावी. तसेच लॉकडाऊन असल्यामुळे दिलेल्या ई-मेल आयडीवरच प्रस्ताव पाठवावेत. आपणांस काही समस्या आल्यास संकेतस्थळावर दिलेल्या कॉल सेंटरला अथवा सहाय्यकास किंवा शिक्षण उपसंचालक कार्यालयास दुरध्वनीद्वारे संपर्क साधावा.

| विषय | तपशिल |
|---|---|
| कॉलेजची माहिती :- | |
| युडायस-क्रमाक :- | |
| एचएससी इंडेक्स क्रमांक : - | |
| कॉलेजचे नांवः- | |
| कॉलेजचा ई-मेल आयडी :- | |
| प्राचार्य यांची माहिती – | |
| प्राचार्य यांचे नांवः- | |
| मोबाईल क्रमांक :- | |

**दक्षता घ्या, सुरक्षित राहा.**

सदरचे प्रसिध्दीनिवदेन या कार्यालयाच्या www.dydepune.com व इ.११वी ऑनलाईन प्रवेशाच्या https://pune.11thadmission.org.in संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

(मीना शेंडकर)
सचिव,
इ.११ वी केंद्रीय प्रवेश नियंत्रण समिती
तथा
सहा.शिक्षण संचालक,
पुणे विभाग पुणे-१

Scanned with CamScanner